# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

# बंदिवान दानिएल



लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Jonathan Hay
अनुवादक: Rev. Shilas Gavit
रूपान्तरकार: Mary-Anne S.

60 गोष्टींतील 31 (पहिली)

**www.M1914.org**

***Bible for Children,*** *PO Box 3, Winnipeg, MB R3C 2G1 Canada*

परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्टविकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

मराठी

Marathi

दानिएल आणि त्याचे तिन मित्र इस्त्राएल मध्ये राहात होते. एके दिवशी एका सामर्थ्यशाली राजा त्यांच्या देशात आला आणि त्या देशातील सर्व हुशार तरुण मुलांना तो त्यांच्या मातृभूमितून दुर देशी घेऊन गेला. त्या राजाचे लांबलचक नाव होते – नबुखद्नेस्सर – आणि तो बाबेल नावाच्या दुर देशात राहात होता.



1

त्या तरुणांना बाबेल देशात चांगली वागणूक देण्यात येत होती. जगातील प्रत्येक देशातून हुशार आणि उत्कृष्ट मुलांना राजाने निवडून घेतले होते. त्या तरुणांनी राजाचे सेवक बनावे आणि राज्यकारभार चालविण्यासाठी त्यांची मदत व्हावी म्हणून राजाने त्यांना बाबेलची भाषा शिकवण्याची योजना केली.



2

जेवण देखिल चांगले होते. राजा जे भोजन करी तेच भोजन ते तरुण देखिल करीत. परंतू दानिएल आणि त्याचे तिन मित्र ते भोजन करु इच्छित नव्हते कारण ते भोजन खोट्या देवांना अर्पण केलेले राहात असे. दानिएलने त्याच्या देवाच्या विरुध्द् काहिहि न करण्याचे वचन दिले होते. मुर्ति किंवा खोट्या देवांच्या बाबतीत आम्ही कोणत्याही प्रकारचा व्यवहार करु नये अशी इस्त्राएलच्या देवाने आज्ञा केली होती.



3

राजाचे भोजन न करण्याची दानिएलने त्याच्या प्रशिक्षकाकडे परवानगी मागितली. जर राजाला हे कळले तर तो फार रागावेल. परंतू या मनुष्याची कृपा दानिएलवर होईल असे परमेश्वराने केले.



4

दानिएल आणि त्याच्या मित्रांची काही दिवस पारख करावी यावर तो प्रशिक्षक सहमत झाला. दहा दिवस पर्यंत ते केवळ शाकाहारी अन्न सेवन करणार आणि फक्त पाणी पिणार असे ठरले. दहा दिवस संपले तेंव्हा जे तरुण राजाचे भोजन करित त्यांच्यापेक्षा दानिएल आणि त्याचे मित्र अधिक सुदृढ आणि चांगले दिसले. म्हणून त्यांना शाकाहारी भोजन खाण्यास व केवळ पाणी पिण्यास परवानगी देण्यात आली.



5

हे तरुण परमेश्वराचा सन्मान करित. आणि देव देखिल त्यांचा मान राखत असे. ज्या गोष्टी ते शिकले होते त्याचे ज्ञान आणि कौशल्य परमेश्वराने त्यांना दिले, आणि दानिएलला सर्व स्वप्ने आणि दृष्टांत समजण्याचे ज्ञान परमेश्वराने दिले.



6



बाबेलमधिल तिन वर्षाच्या शिक्षणानंतर, सर्व तरुणांना नबुखद्नेस्सर राजासमोर उभे करण्यात आले. दानिएल व त्याच्या तिन मित्रांना सर्व तरुणांतून राजाने उत्कृष्ट तरुण असे निवडले. खरे तर, त्याच्या राज्यात असलेल्या सर्व ज्ञानी लोकांपेक्षा दानिएलचे ज्ञान अधिक आहे हे राजाला दिसून आले.

7

एके रात्री, राजाला एक वाईट स्वप्न पडले. त्याने त्याच्या जादुगारांना, ज्योतिष्यांना आणि मांत्रिकांना बोलावणे पाठवून त्याच्यासमोर उभे राहण्यास सांगितले. राजा त्यास म्हणाला, "मला पडलेले स्वप्न समजण्याविषयी माझ्या मनाला तळमळ लागली आहे." तेंव्हा ते ज्ञानी लोक म्हणाले, "महाराज, चिरायु असा ! आपले स्वप्न आपल्या ह्या दासांस सांगा, म्हणजे आम्ही त्याचा अर्थ सांगू."



8

राजाने त्यांना म्हटले, "नाही, तुम्ही माझे स्वप्न आणि स्वप्नाचा अर्थ सांगायलाच हवा. जर तुम्ही सांगू शकला नाहीत, तर तुमचे तुकडे तुकडे करुन तुमची घरे जाळून टाकण्यात येतील !



9

परंतू जर तुम्ही मला स्वप्न व स्वप्नाचा अर्थ काय आहे हे सांगू शकला, तर तुम्हांस माझ्याकडून देणग्या, इनामें व मोठा मान मिळेल." निश्चितच कोणताही ज्ञानी पुरुष राजाला त्याचे स्वप्न व त्याचा अर्थ सांगू शकणार नाही.



10

ज्ञानी पुरुषांनी राजाला म्हटले, "महाराजांची ही गोष्ट सांगेल असा कोणी मनुष्य संपूर्ण जगात नाही. मानवांत वास न करणाऱ्या देवांशिवाय हि गोष्ट कोणीही सांगू शकणार नाही." राजाला फार राग आला. "बाबेलातील सर्व ज्ञानी लोकांना मारुन टाका," असा आदेश राजाने दिला.



11

जेंव्हा सैनिक दानिएलकडे आले, तेंव्हा दानिएलने राजाचा मुख्य कप्तान अर्योक याला म्हटले, "राजा सर्व ज्ञानी लोकांचा नाश का करत आहे?" जे काही घडले होते ते अर्योकने दानिएलला सर्व काही सांगितले. दानिएल राजाला भेटायला गेला. त्याने राजाकडुन अधिक वेळ मागून घेतला जेणेकरुन तो राजाच्या स्वप्नाचा अर्थ सांगू शकेल.



12

मग दानिएल त्याच्या घरि गेला आणि त्याचे सोबती शेद्रक. मेशक आणि अबेद्नगो यांना सर्व वृत्तांत त्याने सांगितला.



13

स्वप्न काय होते किंवा त्याचा अर्थ काय असावा हे दानिएलला माहित नव्हते, परंतु ज्याला हे सर्व माहित होते अशा कोणालातरी तो ओळखीत होता. तो कोणीतरी म्हणजे देव होय. मग दानिएल आणि त्याच्या मित्रांनी प्रार्थना केली.



14

परमेश्वराने दानिएलला स्वप्न व त्याचा अर्थ दाखविला. या प्रमाणे दानिएलने स्वर्गिय देवाचा धन्यवाद केला, तो म्हणाला, "देवाचे नाम युगानयुग धन्यवादीत असो; कारण ज्ञान व बल ही त्याचीच आहेत."



15

दानिएल लगबगीने राजाकडे गेला आणि म्हणाला, "रहस्ये प्रगट करणारा देव स्वर्गात आहे." त्याने राजाला कोणते स्वप्न पडले होते आणि त्या स्वप्नाचा अर्थ काय ते सांगितले.



16

जेंव्हा नबुखद्नेस्सर राजाने स्वप्न व त्याचा अर्थ ऐकला तेंव्हा त्याने पालथे पडून दानीएलास सांष्टांग नमस्कार घातला आणि म्हणाला, "तुमचा देव खरोखर देवाधिव देव व राजेश्वर आहे आणि तुला हे रहस्य प्रकट करता आले म्हणून तो रहस्य प्रगट करणारा देव आहे."



17

त्यानंतर राजाने दानिएलला मोठे पद दिले आणि मोठमोठी इनामे दिली. राजाने त्याला सगळ्या बाबेल परगण्याची सत्ता दिली आणि त्यास बाबेलाच्या सर्व ज्ञान्यांच्या प्रमुखांचा अध्यक्ष केले.



18

बंदिवान दानिएल

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

दानिएल १-२

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे.

ईश्वर आमच्यावर इतके प्रेम करतो की क्रॉसवर मरण्यासाठी आणि आमची शिक्षा भोगण्यासाठी त्याने आपल्या पुत्राला येशूला पाठविले. येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गात परत गेला! आता ईश्वर आमच्या पापांसाठी क्षमा करू शकतो.

जर तुम्ही तुमच्या पापांपासून मुक्ती मिळवू इच्छिता, तर ईश्वराला हे सांगा: प्रिय ईश्वरा, येशू माझ्यासाठी मेला आणि आता पुन्हा जगतो आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल आणि नंतर मी कायम तुझ्याबरोबर राहीन. तुझे मूल होऊन तुझ्यासाठी जगण्यास मला मदत कर. आमेन. जॉन 3:16

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!